# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. पुणे.
## उपविधी

| अ. क्र. | सध्याचा उपविधी क्र. | नवीन उपविधी क्र. | सध्याच्या पोटनियम-नियमांची शब्दयोजना | दुरूस्ती झाल्याप्रमाणे पोटनियम-नियमांची शब्दयोजना | दुरूस्तीची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १. | क-१.१ | क-१.१ | **संस्थेचे निधी सध्याचे उपविधी व खाली दिलेल्या मार्गाने उभारले जातील**<br>४(अ) एस.आय.पी.ठेव योजना :-<br>सदर ठेव दरमहा कमीत कमी ५,०० रू. प्रत्येक सभासदांकडून वसुल केली जाईल. सदर रक्कम सभासदांनी मागणी केल्यास वर्षातून एकदाच परत दिली जाईल. सदर ठेवीवरील व्याज संस्थेच्या आवर्ती ठेवीप्रमाणे राहील. प्रत्येक वर्षी २ एप्रिलला त्याचे एस.आय.पी. खात्यावर जमा केले जाईल. | **संस्थेचे निधी सध्याचे उपविधी व खाली दिलेल्या मार्गाने उभारले जातील**<br>४(अ) एस.आय.पी.ठेव योजना :-<br>सदर ठेव दरमहा कमीत कमी १,०००/- रू. प्रत्येक सभासदांकडून वसुल केली जाईल. सदर रक्कम सभासदांनी मागणी केल्यास वर्षातून एकदाच परत दिली जाईल. सदर ठेवीवरील व्याज संस्थेच्या आवर्ती ठेवीप्रमाणे राहील. प्रत्येक वर्षी २ एप्रिलला त्याचे एस.आय.पी. खात्यावर जमा केले जाईल. | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |
| २. | क-१.३ | क-१.३ | **शेअर्स वर्गणी:-**<br>प्रत्येक सदस्याने किमान मासीक १५००/- रू वर्गणी भरली पाहीजे. | **शेअर्स वर्गणी:-**<br>प्रत्येक सदस्याने किमान मासीक २०००/- रू वर्गणी भरली पाहीजे. | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |
| ३. | ड. १.३.५ | ड. १.३.५ | **सभासद दाखल करुन घेण्याची कार्य पध्दती**<br>स्वेच्छेने राजीनामा देऊ न भागाची रक्कम परत घेणा-या सभासदास पुन्हा सभासद व्हायचे असल्यास त्याने राजीनाम्याच्या वेळी जेवढया रक्कमेचे भाग धारण केले होते तेवढया रक्कमेचे भाग धारण केलेनंतर अथवा सभासदत्व रद्द केले नंतर तीन वर्षे पूर्ण झालेनंतर | **सभासद दाखल करुन घेण्याची कार्य पध्दती**<br>स्वेच्छेने राजीनामा देऊ न भागाची रक्कम परत घेणा-या सभासदास पुन्हा सभासद व्हायचे असल्यास सभासदाने राजीनाम्याच्या वेळी जेवढया रक्कमेचे भाग धारण केले होते तेवढया रक्कमेचे भाग धारण करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संस्थेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिलेल्या | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सभासदत्व देण्यात येईल. | तारखेपासून पुनश्च सभासद (नवीन सभासद) होण्याच्या तारेखपर्यंत प्रतिमाह रुपये २,०००/- प्रमाणे वर्गणी भरावी लागेल. अथवा सभासदत्व रद्द केले नंतर पाच वर्षे पूर्ण झालेनंतर सभासदत्व देण्यात येईल. | |
| ४ | अ.१.२ | | **संस्थेचे कार्यक्षेत्रः-** पुणे जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी (कंपनी कार्यरत आहेत त्या आस्थापनेचे कार्यक्षेत्र) | **संस्थेचे कार्यक्षेत्र :-** संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य राहील. महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार (कंपनी कार्यरत आहेत त्या आस्थापनेचे कार्यक्षेत्र) | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन. बदली झालेल्या सभासदांचे हप्ते परतफेड करण्यासाठी, कर्जास जामीन राहण्यासाठी व इतर कारणांसाठी. |
| ५ | नवीन | परीशिष्ठ ड” | नवीन | **विश्रामगृह सेवा विभागाचे नियम**<br>**संस्था उपविधी क्र. ब.१.१ उ.४ अन्वये करावयाच्या कामकाजासाठीचे नियम**<br><br>**परिशिष्ठ “ड”** | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |

दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसा. लि. * पुणे *

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. पुणे.

## उपविधी

१. **नावः-** पुणे जिल्हा पोलीस विश्रामगृहे सेवा विभाग असे आहे. विश्रामगृहे सेवा विभागास संचालक मंडळाच्या परवानगीने

१) सभासदांना आणि त्यांचे कुटुंबियांना थंड हवेच्या ठिकाणी, तिर्थक्षेत्री, पर्यटन स्थळी, लॉजिंग बोर्डिंग इत्यादी सेवा देता येईल.
२) विश्रामगृह सेवा पुरविण्यासाठी वाहतुक, लॉज, हॉटेल इत्यादी सेवा पुरवठादारांबरोबर सेवा करार करणे.
३) केंद्र अथवा राज्य सरकारांच्या इतर विभागाच्या अंमलदार सहकारी पतसंस्थेचे सभासद दोन संस्थामधील भागीदारी कराराव्दारे या प्रकल्पात समाविष्ठ करता येतील.

२. **भांडवल व निधी**

१) विश्रामगृह सेवा विभाग चालविण्याकरीता दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. पुणे-११ यांचे भांडवलातून आगाऊ निधी/ भांडवल घेतले जाईल. हे भांडवल संस्था संस्थेच्या सभासद कल्याण निधीतून विभागास उपलब्ध करून देईल.
२) विश्रामगृह सेवा विभागात होणारा नफा हा संस्थेच्या नफयात जमा केला जाईल

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **३. उद्देशः- विश्रामगृह सेवा विभागाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.**<br><br>१) संस्थेच्या सभासदांच्या गरजा भागविण्याकरिता पोटनियम क्रमांक 'क' मध्ये नमुद केलेल्या साधनांनी संस्थेकडून निधी घेणे.<br>२) संस्थेचे सभासद, कुटुंबीय व ग्राहक यांचेसाठी थंड हवेच्या ठिकाणी, तिर्थक्षेत्री, पर्यटन स्थळी निवास, भोजन व वाहतूक सेवा उचित दरात उपलब्ध करून देणे.<br>३) वरील क्रमांक १ ते ४ यात नमुद केलेल्या उद्देशांच्या पुर्ततेसाठी जरूर भासणारी व इतर कामे हाती घेणे.<br><br>**४ उपसमितीचे कामे खालीलप्रमाणे असतील-**<br>१) विश्रामगृह सेवेसाठी थंड हवेचे ठिकाण, तिर्थस्थळे व पर्यटन स्थळे यांची निवड करणे.<br>२) निवड केलेल्या ठिकाणी संस्था विश्रामगृह बांधेल अथवा भाडयापट्टयाने आवश्यक ते नुसार संस्था जागा खरेदी करील.<br>३) अशा विश्रामगृहाचे व्यवस्थापन व नियोजन करेल.<br>४) विश्रामगृहाचे परिसरात व क्षेत्रात वृक्षारोपणाची मोहीम घेता येईल.<br>५) विश्रामगृहाचे सेवा विभागाचे अद्ययावत हिशोब व कागदपत्रे तयार ठेवेल. व ते मागणी केल्यास तपासणीसाठी वेळोवेळी संस्थेच्या अधिका-यास | |

दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसा. लि. * पुणे *

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | लेखापरिक्षकास व निबंधकास उपलब्ध करेल.<br>६) सेवेचे दर स्थान व काळ परत्वे ठरविण्यात येतील.<br>७) विश्रामगृह सेवेच्या रकमांचा स्विकार करणे.<br>८) पोटनियमांचे / नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल सभासदावर कशा रितीने व कोणती कारवाई करावयाची याची शिफारस संचालक मंडळास करणे.<br>९) आपल्या सदस्यांच्या गरजा आजमावून चांगल्या सेवा देणे.<br>१०) उपव्यवस्थापक व ज्या इतर कर्मचा-यांच्या रोकडीशी संबंध येत असेल त्यांचेकडून फीडेलिटी बॉंड घेण्याची व्यवस्था करणे.<br>११) विश्रामगृह सेवा विभागाचे / संस्थेचे उद्देश पार पाडण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे विभागाचा व्यवहार चालविणे.<br>१२) उपसमितीला संचालक मंडळाला विश्रामगृह सेवा विभागाची सर्व कागदपत्रे तपासण्याचा अधिकार आहे.<br>१३) सेवा विभागाचे उपसमितीस संस्थेच्या संचालक मंडळास सुचना करता येईल.<br><br>**५. ग्राहक :-**<br>१) दि पुना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमीटेड पुणे-११ संस्थेचे सर्व सभासद हे विश्रामगृह सेवा विभागाचे सेवेसाठी पात्र असतील.<br>२) पोलीस खात्यातून सेवा निवृत्त झालेल्या व संस्थेचे नाममात्र सदसत्व धारण करणा-या व्यक्तीस विश्रामगृह सेवा विभागाचे सेवेचा लाभ घेता येईल. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ३) विश्रामगृह सेवेमध्ये केंद्र अथवा राज्य सरकांराच्या इतर विभागाच्या शासकिय / निमशाकिय, खाजगी कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे सभासद, त्या त्या संस्थेशी भागीदारी कराराव्दारे या प्रक्लपात समाविष्ठ करता येतील.<br><br>**६.विश्रामगृह सेवेचे नियम :-**<br>१) ही विश्रामगृह सेवा फक्त रोखीने उपलब्ध राहील.<br>२) आठ दिवस अगोदर आरक्षण करावे लागेल.<br>३) कोणतेही कारण न देता अध्यक्ष आरक्षण रद्द करू शकतील. असे केल्यास संपुर्ण परताव्याशिवाय इतर काहीही दिले जाणार नाही.<br>४) आरक्षण रद्द केल्यास पंचविस टक्के शुल्क पडेल.<br>५) प्रथम येणा-यास आरक्षण मिळेल.<br>६) आरक्षण रद्द झाल्यास प्रतिक्षा यादीतील सभासदांस सेवा देण्यात येईल.<br>७) संस्थेच्या सभासदाशिवाय इतर सामान्य ग्राहकास उपसमिती वेळोवेळी ठरवेल त्या दराने विश्रामगृह सेवा उपलब्ध करून देता येईल.<br><br>**७.विश्रामगृह सेवेचे कार्यक्षेत्र :-**<br>विश्रामगृह सेवेचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्र राज्य असेल | |